Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 12 June 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १२ जून २०२४ दुपारी १.०० वा.**

****

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ जून पासून सुरु होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित सदस्यांची शपथ, लोकसभा अध्यक्षांची निवड, राष्ट्रपतींचं अभिभाषण होणार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. हे अधिवेशन तीन जुलै पर्यंत चालेल. राज्यसभेचं अधिवेशन देखील २७ जून ते तीन जुलै पर्यंत होणार आहे.

****

तेलगूदेशम पक्षाचे अध्यक्ष चंद्राबाब नायडू यांनी आज आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. विजयवाडा इथं झालेल्या या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री आणि भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.
दरम्यान, ओडिशाचे मुख्यमंत्री म्हणून मोहन चरण मांझी आज शपथ घेणार आहेत. आज संध्याकाळी भूवनेश्वर इथं होणार्या या सोहळ्याला देखील पंतप्रधान मोदी उपस्थित राहणार आहेत.

****

आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या पार्श्वभूमीवर माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं काल आंतरराष्ट्रीय योग दिवस माध्यम पुरस्काराच्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा केली. यावर्षी तीन श्रेणींमध्ये ३३ पुरस्कार दिले जातील. इंग्रजीसह बावीस भारतीय भाषांमध्ये काम करणाऱ्या मुद्रित, दृकश्राव्य आणि रेडिओ श्रेणींमध्ये हे सन्मान प्रदान केले जातील. प्रसारण मंत्रालयात नोंदणीकृत प्रसारण कंपन्या या पुरस्कारासाठी आठ जुलै पर्यंत अर्ज करु शकतात.

****

विधानपरिषदेच्या नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा तिढा सुटला असून, या मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब

ठाकरे पक्षाचे संदीप गुळवे निवडणूक लढवणार आहेत. तर मुंबई पदवीधर आणि शिक्षक तसंच कोकण पदवीधर मतदार संघाची जागा काँग्रेस लढवणार असल्याचं महाविकास आघाडीकडून जाहीर करण्यात आलं आहे.

****

उष्माघाताने मृत रुग्णांना मदत मिळण्याबाबत नैसर्गिक आपत्तीचा निकष लावावा, जेणेकरून आपदग्रस्तांना आर्थिक मदत मिळेल अशी सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. उष्माघातामुळे मृत्यू पावलेल्या नागरिकांची नोंद होत नाही त्यामुळे याबाबत आढावा शासन स्तरावून घेण्यात यावा, तसंच उष्माघाताने मृत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून आर्थिक मदतीचा निकष ठरवण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठीत करावी, अशा सूचना ही गोऱ्हे यांनी दिल्या आहेत.

****

ठाणे जिल्ह्यात डोंबिवली इथल्या औद्योगिक वसाहतीमधल्या इंडो अमाईन आणि अन्य एका कंपनीला आज सकाळी आग लागली. अग्निशमन यंत्रणेच्या मदतीने आग विझवण्यात येत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या कंपन्यांमध्ये कोणी कामगार अडकले आहेत का, याचा शोध सुरु आहे. त्याचबरोबर आसपासच्या विविध कंपन्यांनी तातडीने सगळ्या कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढलं आहे.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६४ वा दीक्षांत समारंभ उद्या विद्यापीठाच्या नाट्यगृहात होणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉक्टर प्रशांत अमृतकर यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सकाळी अकरा वाजता समारंभाला सुरूवात होईल, विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळांवरुन या समारंभाचं थेट प्रसारण करण्यात येणार आहे.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अमेरिकेसोबत होणार आहे. न्यूयॉर्क इथं होणारा हा सामना भरतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. गुणतालिकेत अ गटात भारत पहिल्या तर अमेरिका दुसर्या स्थानावर आहे.
या स्पर्धेत आज झालेल्या अन्य एका सामन्यात ऑस्ट्रेलियानं नामिबियाचा नऊ गडी राखून पराभव केला. तर श्रीलंका आणि नेपाळ दरम्यानचा सामना खराब हवामानामुळे रद्द झाला.

****

दक्षिण आफ्रिकेतल्या डर्बन इथं पार पडलेल्या कॉमरेड मॅरेथॉन स्पर्धेत अमरावतीच्या धावपटूंनी ११ तासात ९० किलोमीटर धावत विक्रम प्रस्थापित केला आहे. यात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रशिक्षक दिलीप पाटील, दीपमाला साळुंखे, पोलीस निरिक्षक अनिल कुरळकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मंगेश पाटील, पोलीस कर्मचारी राजेश कोचे, पोलीस निरिक्षक सतिश उमरे यांचा समावेश आहे.

****

डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या हॉकी पुरुष कनिष्ठ गट विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताला देण्यात आलं आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानं काल स्वित्झर्लंड मध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला.

****

सोलापूर शहर आणि परिसरात गेल्या चार दिवसांपासून सातत्याने पाऊस पडत असल्यानं ओढे, नदी, नाल्यांना पूर आला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातल्या कासेगाव परिसरात झालेल्या पावसामुळे ओढ्याच्या पूलावर आलेल्या पाण्यात तीन जण वाहून गेले. काल रात्री ही घटना घडली. यापैकी एकाचा शोध लागला असून, दोन जण अद्याप बेपत्ता आहेत.

****

हवामान

येत्या दोन दिवसात कोकणात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

****